वर्ष- १२ अंक- २५ मुंबई, मंगळवार,०५ मे २०२६ ते ११ मे २०२६ पृष्ठ-४
ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
मूल्य २/- रुपये
POSTAL REGISTRATION
No. PLG/205/2025- 2027
PG|2

पोलीस बातमी पत्र
POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

लिंग पिसाटांचा कळस...!

3 → मुंबई पालिकेत सत्ता बदलल्याने काय झाले?
ठाणे आणि नवी मुंबईतील जलसाठ्यांना पाणथळ म्हणून मान्यता देण्यास ← 4

www.policebatmipatra.in policebatmi police batmi patra policebatmipatra policebatmipatra@gmail.com

अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांच्या मोर्चाला मराठी जनता देणार उत्तर
15 लाख चालकांना 2 लाख मराठी भिडणार, एकीकरण समितीची घोषणा

मुंबई, महाराष्ट्र सरकारने रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे राज्यभर चर्चा रंगलीय. कारण या सक्तीच्या विरोधात 15 लाख रिक्षा टॅक्सी चालक संपावर जाणार असल्याची घोषणा युनियनने केलीय. याला मराठी एकीकरण समितीने जोरदार प्रत्युत्तर दिलंय. समितीनं महाराष्ट्र सरकारच्या या निर्णयाला पूर्ण पाठिंबा दिला असून, अंमलबजावणीसाठी रस्त्यावर उतरून मोठ्या प्रमाणात आंदोलन करण्याची घोषणा केली आहे. सुमारे दोन लाख मराठी नागरिक या आंदोलनात सहभागी होतील, असे समितीचे अध्यक्ष गोवर्धन देशमुख यांनी सांगितले. याबद्दल सविस्तर जाणून घेऊया. शासनाचा ऐतिहासिक निर्णय : महाराष्ट्र सरकारने रिक्षा-टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा बोलणे अनिवार्य केले आहे. यामुळे स्थानिक प्रवाशांशी थेट संवाद साधता येईल,



सुरक्षितता वाढेल आणि मराठीची प्रतिष्ठा टिकवली जाईल. परिवहन विभागाने यासाठी कडक नियम तयार केले आहेत. हा निर्णय फक्त कागदावर राहणार नाही, तर प्रत्यक्ष अंमलबजावणी होणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळाले आहेत. प्रताप सरनाईक यांचे कठोर आदेश : राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत. रिक्षा-टॅक्सी परवान्यांची नव्याने तपासणी करताना चालक मराठी बोलू शकतो का, याची कसून चौकशी करावी. एक महिन्याच्या आत मराठी न येणाऱ्या चालकांचे परवाने थेट रद्द करण्याचे निर्देश दिले आहेत. मंत्री सरनाईक यांनी वारंवार सांगितले आहे की, कितीही विरोध आला तरी हा निर्णय मागे घेतला जाणार नाही. त्यांचा हा ठाम पवित्रा राज्यातील मराठी भाषा प्रेमींसाठी मोठा दिलासा आहे. परवाना तपासणीची प्रक्रिया कशी असेल : प्रत्येक रिक्षा-टॅक्सी चालकाच्या परवान्याची पुन्हा तपासणी सुरू झाली आहे. चालकाला साध्या मराठीत बोलता येतो का, याची शहानिशा केली जाईल. फक्त कागदावर सही करणे पुरेसे नाही, तर प्रत्यक्ष बोलणे आणि समजणे आवश्यक आहे. ही प्रक्रिया पारदर्शक आणि कठोर असेल. जे चालक स्थानिक भाषा शिकण्यास तयार असतील त्यांना मदत केली जाईल, पण जाणीवपूर्वक टाळणाऱ्यांना मात्र परवान्याची मुदत संपवली जाईल. यामुळे खऱ्या अर्थाने स्थानिक रोजगार संरक्षण होईल. राज्यभर तापले वातावरण : या निर्णयामुळे राज्यात काही ठिकाणी विरोध दिसून येत आहे. काही संघटना आणि व्यक्तींनी निर्णय मागे घेण्याची मागणी केली आहे. मात्र, मंत्री सरनाईक यांनी याला स्पष्ट नकार दिला आहे. ते म्हणतात, ''मराठी ही आमची मातृभाषा आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी आणि सुरक्षिततेसाठी ही सक्ती आवश्यक आहे.'' विरोधकांचे प्रयत्न सुरू असले तरी शासन ठाम आहे. यामुळे मराठी अस्मितेचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

मराठी एकीकरण समितीचा पूर्ण पाठिंबा : मराठी एकीकरण समितीने सरकारच्या या निर्णयाला मनापासून पाठिंबा जाहीर केला आहे. ''ही सक्ती फक्त नियम नाही, तर मराठी भाषेच्या रक्षणाची गरज आहे.'', असे समितीचे अध्यक्ष गोवर्धन देशमुख यांनी सांगितले. समिती आता अंमलबजावणीसाठी सक्रिय होणार आहे. दोन लाखांहून अधिक मराठी नागरिक रस्त्यावर उतरून समितीला साथ देतील, असे देशमुख यांनी स्पष्ट केले. हा पाठिंबा फक्त शब्दात नाही, तर कृतीत दाखवला जाणार आहे.

रस्त्यावर उतरून आंदोलनाची तयारी : समितीने आंदोलनाची घोषणा केली आहे. रस्त्यावर उतरून जनजागृती करणे, सभा घेणे आणि सरकारला पूर्ण सहकार्य देणे असा कार्यक्रम असेल. यात केवळ समितीचे कार्यकर्ते नव्हे तर सामान्य मराठी नागरिक, विद्यार्थी आणि सामाजिक संघटनाही सामील होतील. आंदोलन शांततेत आणि कायद्याच्या चौकटीत राहील, असे आश्वासन समितीने दिले आहे. यामुळे निर्णयाची अंमलबजावणी वेगाने होईल आणि मराठी भाषेचे महत्त्व सर्वांना कळेल.

भाषा शिकवण्याच्या उपक्रमांना ठाम विरोध

काही ठिकाणी रिक्षा चालकांना मराठी शिकवण्याचे उपक्रम राबवले जात आहेत. मात्र, मराठी एकीकरण समितीने याला स्पष्ट विरोध दर्शवला आहे. समितीचे म्हणणे आहे की, ''ज्यांना मराठी येत नाही त्यांना फक्त शिकवून ह्यचमकेशगिरीह्ल करणे चुकीचे आहे. स्थानिक रोजगारात सहभागी होण्यासाठी मराठी शिकणे ही जबाबदारी चालकांची आहे.'' शासनाने सक्ती केली आहे त्यामुळे वेगळे उपक्रम नकोत. यामुळे खऱ्या मराठी रक्षणाला बळ मिळणार आहे. हा निर्णय केवळ रिक्षा-टॅक्सी क्षेत्रापुरता मर्यादित नाही तर संपूर्ण महाराष्ट्रातील मराठी अस्मितेचा प्रश्न आहे. प्रवाशांना स्थानिक भाषेत सेवा मिळाली तर विश्वास वाढेल, अपघात कमी होतील आणि रोजगारातील स्थानिकांचा वाटा वाढेल, असे सांगण्यात आले आहे. मराठी एकीकरण समितीचे हे आंदोलन यशस्वी झाल्यास भाषेच्या रक्षणात नवा अध्याय लिहिला जाणार आहे.

जुना करार संपला, नव्याची परवानगी नाही
एसटीमध्ये डिझेलची टंचाई, राज्यात वाहतूक विस्कळीत

मुंबई। एकीकडे डिझेल खरेदीचा जुना खरेदी करार संपला तरी नव्या खरेदीची परवानगी आलेली नसल्याने एसटी महामंडळात प्रचंड गोंधळ माजला आहे. इंधनावरच्या खर्चात कपात करण्यासाठी गुजरातमधून डिझेल खरेदी करण्याचा निर्णय अलिकडे महामंडळाने घेतला आहे. पण राज्य सरकारच्या अर्थ खात्याने त्याला परवानगी दिली नाही. परिणामी इकडे डिझेलअभावी राज्यातील ५५ आगारातील वाहतूक विस्कळीत झाली आहे. यामुळे प्रवासी व चालक या दोघांनाही त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचा आरोप महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसने केला आहे. एसटीला दररोज सरासरी १० लाख ८७ हजार लिटर इतके डिझेल लागते. इंधनावर वर्षाला सरासरी ३ हजार ४०० कोटी खर्च होत आहे. महाराष्ट्राच्या तुलनेत गुजरातमध्ये मूल्यवर्धित कर कमी असल्याने तिथून खरेदी करण्याचा निर्णय एसटी महामंडळाने घेतला होता. त्यासाठी निविदा काढण्यात




आली होती व अर्थ खात्याकडे गुजरातमधून डिझेल खरेदी करण्याची परवानगी मागितली होती. पण अर्थ खात्यातील अधिकाऱ्यांनी त्याला अद्यापी हिरवा कंदील दाखवलेला नाही. दरम्यान पूर्वीची पुरवठादार कंपनी बीपीसीएलचा करार संपल्याने त्यांनी एक महिन्यापासून डिझेल देणे बंद केले असून परिणामी फेऱ्या उशिरा जात आहेत. त्याचा परिणाम प्रवासी उत्पन्नावर झाला असून हंगामी भाडेवाढ करूनही अपेक्षित उत्पन्न मिळालेले नाही. साधारण १५ टक्के प्रवासी उत्पन्नाला त्याचा फटका बसला असून ऐन हंगामात एसटीचे आर्थिक नुकसान झाले आहे. याला निव्वळ राज्य सरकारचे अर्थ खाते जबाबदार असून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात मध्यस्थी करून तात्काळ उचित निर्णय घ्यावा अशी मागणी महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी यांनी केली आहे. एसटीकडे एकूण २५१ डिझेल पंप असून त्यातील १९६ आयओसीचे व ५५ बीपीसीएलचे आहेत. बीपीसीएलचे कंत्राट संपल्याने ५५ डिझेल पंप गेले महिनाभर बंद आहेत. ज्या आगारातील पंप बंद आहेत, तिथल्या गाड्यांना दुसऱ्या आगारात डिझेल भरण्यासाठी जावे लागत आहे. गाड्या वाढल्याने मोठ्या रांगा लागत आहेत. गाडी घेऊन चालकांना तासनतास रांगेत राहून डिझेल भरावे लागत आहे. या प्रकारामुळे ऐन उन्हाळ्यात चालकांना शारीरिक व मानसिक ताण त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचेही बरगे यांनी म्हटले आहे.

डोंबिवली हत्याकांडाचा मास्टरमाइंड अडीच वर्षांनी जेरबंद!
वेश बदलून नांदेडच्या शेतात करत होता काम, पोलिसांनी अखेर आवळल्या मुसक्या



२०२३ मधील डोंबिवली येथील एका हत्याप्रकरणातील मुख्य आरोपीला, अडीच वर्षांच्या कसून शोधमोहिमेनंतर पोलिसांनी अटक केली. नांदेडमध्ये शेतमजूर म्हणून वेशांतर करून राहत असलेल्या दीपक करकाडे याला, पाळत ठेवून आणि एका गुप्त मोहिमेद्वारे जेरबंद करण्यात आले. एका किरकोळ वादातून सोमनाथ शिंदे याची हत्या केल्याचा आरोप त्याच्यावर आहे.

डोंबिवली। डोंबिवली हत्याकांडाचा मास्टरमाइंड अडीच वर्षांनी जेरबंद करण्यात आला. वेश बदलून नांदेडच्या शेतात काम करत होता, मात्र पोलिसांनी डोकं लावून वेशांतर करत फिल्मी स्टाइलने कारवाई करत मुसक्या आवळल्या. डोंबिवलीच्या विष्णुनगर पोलीस ठाणे परिसरात 27 नोव्हेंबर 2023 रोजी झालेल्या सोमनाथ बाबू शिंदे यांच्या हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी दीपक करकडे (वय 28) याचा पोलिसांनी नांदेड जिल्ह्यातील वाटेगाव येथे शोध घेतला. तब्बल अडीच वर्षानंतर पोलिसांनी तपास सुरु ठेवत, आरोपीला अटक केली. नेमकी घटना काय? नोव्हेंबर 2023 मध्ये देवीचापाडा येथील स्मशानभूमीजवळ खाडीच्या किनारी एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळून आला होता. डोक्यावर आणि तोंडावर दगडाने हल्ला करत आरोपीवर पोलिसांनी गुन्हा दाखल केल्याची माहिती समोर आली. संबंधित प्रकरणातील सीसीटीव्ही आणि गुप्त माहितीच्या आधारे मृताची ओळख सोमनाथ शिंदे असल्याचे सांगण्यात येते. तरुणावर दगडाने हल्ला करत ठेचून ठार मारलं संबंधित घटनेनंतर पोलिसांनी विलन ठावरे आणि योगेश डोंगरे यांच्या देखील याआधी मुसक्या आवळल्या होत्या. त्यांच्या चौकशीनंतर किरकोळ वादातून दीपक करकडे यांच्या मदतीने सोमनाथ शिंदे यांच्यावर दगडाने हल्ला करत ठेचून ठार मारल्याचा कबुलीनामा दिला. मात्र, संबंधित घटनेनंतर मुख्य आरोपी दीपक करकडे हा पोलिसांना हातावर तुरी देऊन फरार झाल्याची माहिती समोर आली. दीपक करकडेने मोबाईल सिमकार्ड आणि वास्तव्याचे ठिकाण बदलले होते. विष्णुनगर पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि मोबाईल लोकेशनच्या मदतीने माग काढला. आरोपी हा नांदेडमध्ये असल्याची खात्री पटल्यानंतर 24 एप्रिल 2026 रोजी सायंकाळी पोलीस पथकाने वाटेगाव येथे वेशांतर करून सापळा रचत डोकं लढवून त्याला ताब्यात घेतले. संबंधित प्रकरणानंतर अडीच वर्षानंतर गुन्हेगाराला कायद्याच्या चौकटीत बसवले. यामुळे आता पोलिसांच्या कार्यक्षमतेचे कौतुक होऊ लागलं आहे.



पोलीस बातमी पत्र

आक्रोश

२

मुंबई, मंगळवार,०५ मे २०२६ ते ११ मे २०२६

लिंगपिसाटांचा 'कळस'...!

- नसरापूर, चाकणमध्ये चिमुरड्यांवर अत्याचार करुन निघृण खून:
- पुण्यासह महाराष्ट्रात प्रचंड खळबळ
- नवले ब्रिज वर काही काळ तणाव

नसरापूर , चाकण मध्ये चिमुरडींवर अत्याचार करून खून



महिला संतप्त; तरुणींसह रोखला महामार्ग...!

- शुक्रवारी झालेल्या या निंदनीय घटनेमुळे नसरापूर आणि चेल्लाडी फाटा येथील नागरिक चांगलेच संतप्त झाले होते; गावातील ागरिकांनी आणि छोट्या मोठ्या ापायिकांनी उस्फूर्तपणे ेल सर्व व्यवहार बंद ठेवत निषेध केला. संतप्त ागरिकांनी थेट पुणे र्ग गाठत तब्बल चार ा रोको आंदोलन े महिला आणि नाचे नेतृत्व स्वत: हातात घेत पोलीसांना जाब विचारत पोलीस प्रशासनाला धारेवर धरले. कांबळे याला न्यायालयात हजर करण्यास आणले असता संतप्त महिला, तरुण आणि तरुणांनी पोलीसांच्या गाडीसमोर आडवे होउन त्याला ताब्यात देण्याची मागणी केली. अखेर पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल आणि अन्य पोलीसांनी मध्यस्थी करत या संतप्त जमावाच्या तावडीतून कांबळे याची सुटका केली.


पडसाद पुण्यातील नवले ब्रिज परिसरात उमटले संतप्त नागरिकांनी पुणे बेंगलोर महामार्गावरील नवले ब्रिज रोखून धरत या नराधमाला फाशीची मागणी केली. त्यामुळे या परिसातर काही काळ तणावाचे वातावरण तयार झाले होते. ही घटना ताजी असतानाच चाकणमध्येही एका परप्रांतीय अल्पवयीन तरुणाने तीन वर्षाच्या बालिकेवर अत्याचार करुन तिची गळा चिरुन निघृण हत्या केली; हा नराधम पसार झाला असून त्याच्या तपासासाठी पोलीसांची पथके रवाना करण्यात आली आहे. दरम्यान; या दोन घटनांची राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीर दखल घेतली आहे. या दोन घटनांचा खटला 'फास्ट ट्रॅक' न्यायालयात चालविण्यात येणार असून या नराधमांना मृत्युदंडाची शिक्षा द्यावी; अशी आग्रही मागणी उच्च न्यायालयाकडे करण्यात येणार आहे अशी माहिती फडणवीस यांनी दिली. भिवाजी कांबळे (वय ६५; रा. नसरापूर, ता. भोर, जि. पुणे) असे या नराधमाचे नाव आहे; पोलीसांनी तांत्रिक विश्लेषणाद्वारे तपास करत अवघ्या दीड तासात या नराधमाला गजाआड केले आहे.नसरापूर येथील ही तीन वर्षांची चिमुरडी उन्हाळयाच्या सुट्टीनिमित्त तिच्या आजोळी आली होती; काल दुपारी ती खाऊ आणण्यासाठी बाहेर आली होती. त्यावेळी कांबळे याने त्या मुलीला गाठले आणि तिला वासरु दाखवतो असे आमिष दाखवून तिला घेऊन तो जवळच असलेल्या म्हशीच्या गोठ्यात घेऊन गेला; तेथे नेल्यानंतर तिच्यावर अत्याचार करुन तिचा निघृणपणे खून केला. दरम्यान; ही मुलगी बराचवेळ घरी न आल्याने तिच्या नातेवाईकांनी आणि जवळच्या रहिवाशांनी तिचा तपास सुरु केला. त्यावेळी जवळच असलेल्या सीसी टीव्हीमध्ये कांबळे हा या मुलीला घेऊन गोठ्यात गेला असल्याचे स्पष्टपणे दिसले; त्यांनी गोठ्यात जाऊन पाहिले असता ही चिमुरडी मृतावस्थेत आढळून आली. संतप्त नातेवाईकांनी आणि ग्रामस्थांनी कांबळे याला पकडून त्याला जबरदस्त मारहाण केली; ही घटना पोलीसांना समजताच त्यांनी घटनास्थळी तात्काळ धाव घेत कांबळे याला तात्काळ ताब्यात घेतले. संतप्त नागरिकांनी गाव बंद ठेवत तब्बल तीन ते चार तास पुणे-बंगळूर महामार्ग रोखून धरला; जोपर्यंत आरोपीला चौकात जाहीर फाशी देत नाही तोपर्यंत रस्ता मोकळा करणार नाही अशी संतप्त भूमिका ग्रामस्थांनी घेतली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत ग्रामस्थांची समजूत काढली; त्यामुळे याठिकाणी काहीकाळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

ही घटना ताजी असतानाच चाकण येथे मूळचा बिहारी असलेल्या सोळा वर्षीय अल्पवयीन तरुणाने तीन वर्षाच्या चिमुरडीवर अत्याचार करुन तिचा गळा चिरुन तिची निघृण हत्या केली; या चिमुरडीचे कुटुबिंय मूळचे मध्यप्रदेशातील असून ते कामानिमित्त चाकण परिसरात स्थायिक झाले आहेत. या बिहारी तरुणाने या चिमुरडीला खाऊचे आमिष दाखवून तिला निर्जळस्थळी नेले; तिच्यावर अत्याचार करुन तिचा गळा चिरुन खून केला. ही घटना उघडकीस येताच चाकण आणि परिसरात प्रचंड खळबळ उडाली असून महिलांचा विशेषत: चिमुरड्यांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.



माता-भगिनी, लेकी बाळींसाठी प्रत्येक जागा असुरक्षित आणि प्रत्येक क्षण दहशतीचा झाला. नसरापूरमधील त्या चिमुकलीचा आक्रोश गृहमंत्रालयापर्यंत पोहोचतोय का? तुमची यंत्रणा फक्त कागदावर भक्कम आहे का? राज्यातील महिलांसाठी हा काळ काळरात्र ठरत आहे, राज्यातील महिलांवरील अत्याचाराच्या घटना रोखण्यात राज्य शासनाला आणि विशेषत: गृहखात्याला सपशेल अपयश आले असल्याचे या दोन घटनांवरुन पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

—विजय वडेट्टीवार;
नेते काँग्रेस




ही घटना निश्चितच निंदनीय आहे; अशा घटनांमध्ये कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. या नराधमाला लवकरात लवकर शिक्षा व्हावी यासाठी हा खटला 'फास्ट ट्रॅक' कोर्टात चालविण्यात येणार आहे; त्याशिवाय अशा नराधमांसाठी मृत्युदंडाचीच शिक्षा योग्य असून त्यासाठी उच्च न्यायालयाला विनंती करण्यात येणार आहे.

—देवेंद्र फडणवीस; मुख्यमंत्री तथा गृहमंत्री



जिल्ह्यात सलग घडलेल्या या दोन घटना निश्चितच निषेधार्ह अशाच आहेत; या घटनांनी माणुसकीला काळीमा फासला गेला आहे. त्यामुळे नागरिकांचा विशेषत: महिला आणि तरुणींचा राग निश्चितच योग्य आहे; या आरोपीला लवकरात लवकर कडक शिक्षा व्हावी यासाठी पोलीसांच्या वतीने प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यासाठी स्थानिक पोलीस आणि ग्रामीण पोलीसांच्या गुन्हे शाखेच्या वतीने समातंर तपास करण्याच्या सूचना संबधितांना देण्यात आल्या आहेत.

— संदीपसिंह गिल;
पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण



"महाराष्ट्रात वारंवार अशा प्रकारच्या घटना घडताना दिसत आहेत, ही अत्यंत गंभीर बाब आहे. या प्रकरणात लवकरात लवकर चार्जशीट दाखल होऊन आरोपीला कठोरात कठोर शिक्षा झाली पाहिजे. तसेच दोष सिद्धीचे प्रमाण (कन्विक्शन रेट) वाढवण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबवणे आवश्यक आहे." महिलांच्या सुरक्षेसाठी गाव पातळीवर महिला दक्षता समित्या आणि महिला सुरक्षा समित्यांची स्थापना करण्यावर त्यांनी भर दिला. "गावागावांत लोकसहभागातून सुरक्षा यंत्रणा उभी राहिली पाहिजे. प्रत्येक गावात ''बिट मार्शल' असावा, जेणेकरून संशयास्पद हालचालींची माहिती त्वरित पोलिसांपर्यंत पोहोचेल,"

— विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

कांबळे लिंगपिसाटच...!

- कांबळे हा लिंगपिसाट प्रवृत्तीचा आहे; यापूर्वी १९९८ आणि २०१५ मध्येही अशाच पद्धतीने दोन चिमुरड्या मुलींवर अत्याचार केले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे त्यातील एक पिडीत अत्याचारीत चिमुरडी ही त्याच्या सख्ख्या भावाची मुलगी आहे; याप्रकरणी त्याला शिक्षाही झाली होती. येरवडा कारागृहात काही वर्षांची शिक्षा भोगल्यानंतर तो नुकताच पॅरोलवर सुटुन आला होता; पुन्हा त्याने असाच प्रकार केल्याने तो लिंगपिसाटच असल्याचे सिद्ध झाले आहे.

पुणे पोलीस नुसत्या सेटलमेंट वर

नसरापूरच्या पाठोपाठ चाकणची बातमी समोर आली आणि त्याच रात्री एका पोलीस एपीआय ने पोलीस निरीक्षक पदी बदली होत असताना देखील लाच घेतल्याची बातमी येऊन धडकली. प्रत्येक आठवड्याला पुणे पोलिसांची काही ना काही तर एक नकारात्मक बातमी येत राहते. यावरून गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आंदण घेतलेले पुणे पोलीस हे किती कुचकामी आहे याची जाणीव आता सर्वसामान्य जनतेला होत आहे.

आज फडणवीस सत्ताधीश आहेत आणि स्वर्गीय अजित दादा नंतर संपूर्ण पुणे शहर - ग्रामीणवर त्यांचा एक छत्री अमल आहे . परंतु तरी देखील पुण्यातील क्राइम ते कमी करू शकले नाहीत . इतकेच नव्हे तर पोलिसांची बेजबाबदार आणि भ्रष्टाचारी मानसिकता देखील त्यांना तसू भरही ही कमी करता आली नाही. नसरापूरचा आरोपी हा यापूर्वी अशाच प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये आरोपी होता . शिवाय सध्या तो प्यारोलवर होता . त्यामुळे अशा गुन्हेगारांवर नजर ठेवण्याची पोलिसांची जबाबदारी आहे.

पोलीस निरीक्षक , त्यांनी पेरलेले खबरे ,पोलीस हवालदार , डी बी पथके यांची ही प्राथमिक जबाबदारी आहे. मात्र असा कुख्यात गुन्हेगार बाहेर असताना वेळी पोलिसांची काहीच जबाबदारी नाही का ? यापूर्वी देखील अनेक लहान मुलींवर झालेले अत्याचार , महिलांवरील बलात्कार आणि महिलांविषयी घडणाऱ्या गुन्ह्यांमुळे पुणे पोलिसांचे प्रतिमा खालावली असून गृहमंत्री फडणवीस यांचे या खात्यावर अजिबात नियंत्रण नसल्याची भावना नागरिकांत व्यक्त होत आहे.

एखाद्या गुन्ह्यात अटक केलेला आरोपी सुटल्यानंतर पुन्हा तोच गुन्हा करतो याचा अर्थ पोलिसांचे बिलकुल नियंत्रण नाही किंवा त्यांचा धाक राहिलेला नाही हेच स्पष्ट होते. किंबहुना गुन्ह्यामध्ये आरोपी असलेला पुण्यामध्ये प्रत्यक्ष सहभाग असलेला माणूस कोर्टातून सुटतोच कसा ? पोलिसांचे यामध्ये काहीच जबाबदारी नाही का. इतर वेळी केवळ फिर्याद दाखल करण्यात आलेल्या अंगावर वसकणारे आणि त्यांना नामोहरम करणारे पोलीस अशा



पुणे शहर पॉस्को केसेस
2024. 252
2025 280



महिला व मुलांवरील केसेस
2024 1960
2025 22 22

नसरापूर : ऐन्या महाराष्ट्रात महाराष्ट्रदिनाचा आणि कामगार दिनाचा जल्लोष सुरु असतानाच भोर तालुक्यातील नसरापूर येथे अवघ्या तीन वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करुन तिचा निघृणपणे खून करण्यात आल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे; धक्कादायक बाब म्हणजे हा अत्याचारी आणि खूनी तब्बल ६५ वर्षे वयाचा असून यापूर्वी त्याच्यावर बलात्काराचे तब्बल दोन गुन्हे दाखल आहेत. एका गुन्ह्यात तर त्याने सख्ख्या भावाच्या मुलीवरच अशाप्रकारे अत्याचार केला होता; राजगड पोलीसांनी या नराधमाच्या मुसक्या आवळल्या असून त्याला ७ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. माणुसकीला काळीमा फासलेल्या या घटनेने नसरापूर गावात 'स्मशान शांतता' पसरली असून, नागरिक आणि महिलांनी संघटीत होत पुणे-बेंगळूर महामार्ग रोखून धरत आरोपीला आमच्यासमोरच फाशी देण्याची आग्रही मागणी केली; दरम्यान घटनेचे तीव्र कोख्यात आणि विकृत गुंडांबद्दल मवाळ कसे होतात ? चा अनेक प्रश्न जनतेच्या मनात आहेत. 2025 मध्ये तब्बल 280 हुन अधिक बलात्काराच्या केसेस नोंदणी करून झाले आहेत. केस दाखल करा म्हणून आलेले आणि परत हाकलून दिलेल्या ही संख्या तर यामध्ये नाहीच. महिला आणि बालकांवरील तर एकूण गुणांची संख्या तब्बल 2200 हून अधिक झाली आहे.

इतका मोठा कोट्यावधीचा खर्च इतकी सर्वराई येथे कोड कौतुकाचे नगारे आणि प्रत्यक्ष गुन्ह्यांचा चढता आलेख हे पुणे पोलिसांसह गृहमंत्री फडणवीस यांचे अपयश नाही का ?

आजही अनेक फिर्यादी घेतल्या जात नाहीत परस्पर सेटलमेंट आणि ऍडजस्टमेंट करण्यामध्ये पुणे पोलीस हे कुख्यात होत आहेत.

गेल्याच आठवड्यामध्ये धायरी येथे एका ज्वेलर्सने सामान्य महिलेला फसवल्याप्रकरणीची फिर्याद घेण्यास देखील नांदेड सिटी पोलिसांनी पोलिसांनी तब्बल एक महिना लावला . खाकी वर्दीतील या प्रवृत्तीची माणुसकी का संपत चालली आहे ? असा प्रश्न सध्या नागरिकांना पडला आहे.

7 मे पर्यंत पोलीस कोठडी आणि आरोपीचा बनाव

या प्रकरणातील नराधम आरोपीला पुणे न्यायालयाने 7 मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. विशेष न्यायाधीश एम. जी. चव्हाण यांच्यासमोर ही सुनावणी पार पडली. यावेळी आरोपीने स्वतःला वाचवण्यासाठी न्यायालयात एक धक्कादायक बनाव रचला, मात्र पोलिसांनी कडक युक्तिवाद केल्यानंतर त्याचा पोलीस कोठडी सुनावण्यात आली. पोलिसांनी आरोपीला न्यायालयात हजर केल्यानंतर, "काही तक्रार आहे का?" असे न्यायाधीशांनी विचारले. यावर आरोपीने अत्यंत निर्लज्जपणे उत्तर देत, "किरकोळ भांडणातून मला या प्रकरणात गोवण्यात आले आहे," असा बचाव केला. मात्र, पोलिसांनी सादर केलेले प्राथमिक पुरावे आणि घटनेचे गांभीर्य लक्षात घेता त्याचा हा दावा फोल ठरला. तपास अधिकारी विजयमाला पवार आणि विशेष सरकारी वकील अरुंधती ब्रह्मे यांनी न्यायालयात आरोपीच्या कोठडीची मागणी करताना महत्त्वाचे मुद्दे मांडले. आरोपीने चिमुकल्या मुलीवर लैंगिक अत्याचार केला आहे, त्या अनुषंगाने त्याची वैद्यकीय तपासणी, रासायनिक विश्लेषण तपासणी आणि सक्षमतेची चाचणी करायची आहे. आरोपीने यापूर्वीही असे गुन्हे केले आहेत का किंवा पीडितेवर आधी अत्याचार झाले आहेत का, याचा तपास करायचा आहे. ज्या शस्त्राने चिमुकलीची हत्या केली, ते शस्त्र जप्त करायचे असून साक्षीदारांचे जबाब नोंदवायचे आहेत. या गुन्ह्यात त्याला इतर कोणी मदत केली आहे का, याचीही चौकशी केली जाणार आहे, असा युक्तिवाद तपास अधिकाऱ्यांनी केला.


पीडिताच्या कुटुंबीयांची चपराक : भेटायला येऊ नका



या बालिकेचा जीव गेल्यानंतर आता काही राजकारणी लोक आणि स्वयंसेवी संघटनांचे प्रमुख शो बाजी करण्याकरता पीडित मुलीच्या त घरी जात आहेत . जाताना कॅमेरामन , फोटो शो शूटिंगचा डाम डौल देखील असतो . या सगळ्यामुळे उद्विग्न झालेल्या पिढीतेच्या कुटुंबीयांनी आता या सर्वांना चपराक दिली आहे. भेटायला येऊ नका. माझ्या मुलीला न्याय मिळाला पाहिजे . त्या नराधमाला फाशीच झाली पाहिजे , न्याय मिळत नाही तोपर्यंत नेतेमंडळींनी भेटायला येऊ नये, असं आवाहन पीडितेच्या वडिलांनी केलं आहे. पीडित चिमुकलीचे वडील आस्थी विसर्जनासाठी देहू या ठिकाणी गेले असताना, विविध पक्षांचे नेते त्यांच्या घरी सांत्वनासाठी भेट देत आहेत. पण चिमुकलीच्या वडिलांनी नेतेमंडळींना भेटायला येऊ नये, असं म्हटलं आहे.

संपादकीय

मुंबई पालिकेत सत्ता बदलल्याने काय झाले?



संपादक दिपक मोरेश्वर नाईक

जसा हॅपीनेस इंडेक्स वगैरे काढला जातो, त्याचप्रमाणे जगभरातल्या प्रमुख महानगरांतल्या लोकांच्या सहनशीलतेचा अभ्यास केला, तर मुंबईतले लोक पहिल्या क्रमांकावर येतील. गेली जवळपास दोन दशके मुंबईकर फक्त आणि फक्त गैरसोयी सहन करताहेत. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या सत्तेच्या काळात मुंबई महापालिकेत भ्रष्ट कारभार सुरू असल्याची टीका भाजपकडून होत होती. त्यानंतर कोविडचा काळ आला. दरम्यानच्या काळात लोकनियुक्त पदाधिकाऱ्यांची मुदत संपली आणि महापालिकेवर प्रशासक राज आले. अशा तीन वेगवेगळ्या कालखंडांनंतर ६० हजार कोटींच्या महापालिकेवर भारतीय जनता पक्षाची सत्ता आली. महापालिका निवडणुकीत भाजपचे नेतृत्व दोन प्रमुख नेत्यांकडे होते, एक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दुसरे मुंबई भाजपचे नेते सांस्कृतिक कार्य आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार. या दोघांनी निवडणुकीची व्यूहरचना आखली. ठाकरे बंधू एकत्र आले असतानाही त्यांना सत्तेत येण्यापासून रोखले. भाजपची सत्ता आणली. सत्ता आल्यानंतर आपली जबाबदारी संपली असे समजून आपापल्या मार्गाला लागले. कठिण काळात मुंबईकरांनी दिलेल्या या कौलाचा आदर राखून भाजपच्या शीर्षस्थ नेतृत्वाने मुंबईकरांकडे अधिक काळजीपूर्वक लक्ष देणे गरजेचे होते. दुर्दैवाने तसे घडताना दिसत नाही.

भारतीय जनता पक्ष हा निष्ठेला महत्त्व देणारा पक्ष. परंतु मूळच्या काँग्रेसच्या असलेल्या रितू तावडे यांना महापौरपद देऊन भाजपने वेगळे संकेत दिले. महापौरांसंदर्भात मत बनवण्यासाठी त्यांना प्रतीक्षा करावी लागेल. पण फर्स्ट इम्प्रेशन महत्त्वाचे असते आणि ते पाहिले तर एकूण आनंदी आनंदच दिसतो. निवड झाल्या झाल्या फुटपाथवरच्या बांगलादेशींचा विषय त्यांनी काढला. पण बांगलादेशींचा मुद्दा अमित शहा आणि देवेंद्र फडणवीस यांना अडचणीत आणणारा आहे, हे त्यांना लक्षात येत नाही. भोंदू अशोक खरातला टोचून मारण्यासंदर्भातील वक्तव्य असो किंवा जैन मुनींच्या संदर्भाने केलेले वक्तव्य असो, मुंबईच्या प्रथम नागरिकाची क्षमता कोणती हे पहिल्या काही दिवसांतच कळून चुकले. टीका करणाऱ्यांना प्रत्युत्तर देताना, तुमच्या घरात आया-बहिणी नाहीत का? ही मुंबईच्या प्रथम नागरिकाची भाषा आहे, यावर विश्वास बसत नाही.



मुंबई महापालिका कायद्यानुसार आयुक्तांना जास्तीचे अधिकार आहेत, परंतु मुंबईचे महापौरपद हे मोठे प्रतिष्ठेचे पद आहे. मुंबईतल्या कोणत्याही समारंभात राज्यपाल, मुख्यमंत्र्यांच्या बरोबरीने महापौरांना मान असतो. त्यामुळे अधिकार कमी असले तरी मुंबईचा कारभार चालवण्यासाठी सक्षम महापौर दिल्याचे किमान चित्र उभे करण्याचा प्रयत्नही भाजपने केलेला नाही. म्हणजे एवढा मोठा संघर्ष करून भाजपने मुंबई महापालिकेची सत्ता हस्तगत केली. परंतु तिथे माणसे नेमताना फारशी काळजी घेतली नसल्याचे दिसून येते. प्रभाकर शिंदे यांच्यासारख्या अनुभवी व्यक्तीकडे स्थायी समितीची सूत्रे दिली, ही त्यातल्या त्यात सामाधानाची गोष्ट. परंतु भाजपच्या नव्या व्यवस्थेने लोकप्रतिनिधी आणि कंत्राटदार यांच्यामध्ये 'प्रभावी' टोलनाका बसवला आहे. मुंबई महापालिका हे ठाकरेंचे एटीएम मशीन आहे, अशी टीका करणाऱ्या भाजपला मुंबई महापालिकेत बाहेरच्या एजंटांना किती मोकळे रान द्यायचे, हे ठरवावे लागणार आहे.

मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी निवृत्त झाल्यानंतर त्यांच्या जागी अश्विनी भिडे यांना आणण्यात आले. प्रसारमाध्यमांतून त्यांचे कौतुक सोहळे सुरू झाले. महिलाराजचा गवगवा सुरू झाला. मेट्रो कारशेडसाठी मध्यरात्री वृक्षतोड करण्याशी अश्विनी भिडे यांचे नाव जोडले आहे हे विसरता येणार नाही. मुंबई मेट्रोची जबाबदारी त्यांनी उत्तमरीतीने पार पाडली, ही गोष्ट खरी. म्हणून त्या जादूची कांडी फिरवून मुंबईकरांचे जगणे सुसह्य करतील, अशी अपेक्षा बाळगून सगळी जबाबदारी त्यांच्या खांद्यावर टाकणे अवास्तव ठरेल. आता मुंबईपुढची आव्हाने बघू गेल्यावर्षी पावसाळा मे महिन्याच्या मध्यावरच सुरू झाला होता. गाळ उपसा करण्यावर त्याचा परिणाम झाला आणि मुंबईकरांना त्याचा फटका बसला. यापूर्वी नालेसफाईच्या मुद्द्यावरून भाजपने शिवसेनेवर अनेकदा आरोप केले आहेत. म्हणूनच सत्ता आल्यानंतर पहिल्या वर्षी त्यासंदर्भात अधिक काळजी घ्यायला हवी होती, ती घेतलेली दिसत नाही. यंदा कंत्राटदारांनी महापालिकेच्या अटीवर काम करणार नसल्याचे निक्षून सांगितले. यंदा मिठी नदीतील गाळ उपसा करण्यासाठी खूप उशीर झाला. कंत्राटदार मिळत नसल्याने तसेच अन्य काही कारणांमुळे टेंडर प्रक्रिया वेळेत पूर्ण झाली नाही. मार्चमध्ये अनेक वेळा डेडलाइन वाढवावी लागली. अखेर कंत्राटदार नियुक्त झाले आणि मार्च अखेरीस प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली. गाळ काढण्यासंदर्भातील एकूण परिस्थिती पाहता पूर नियंत्रणाच्या मर्यादा उघड्या पडण्याची भीती निर्माण झाली. जसा हॅपीनेस इंडेक्स वगैरे काढला जातो, त्याचप्रमाणे जगभरातल्या प्रमुख महानगरांतल्या लोकांच्या सहनशीलतेचा अभ्यास केला, तर मुंबईतले लोक पहिल्या क्रमांकावर येतील. गेली जवळपास दोन दशके मुंबईकर फक्त आणि फक्त गैरसोयी सहन करताहेत. रस्त्यांचे खोदकाम, पुलांची पाडकामे याचा सामान्य लोकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. एकनाथ शिंदे यांच्या काळात मुंबईतले रस्त्यांचे कंत्राटदार बदलले. महामागार्ची कामे करणारे कंत्राटदार मुंबईतल्या रस्त्यांसाठी आणले. त्यांना आतल्या रस्त्यांचा अंदाजच आला नाही. त्यांनी सगळीकडे रस्ते खोदून ठेवले. शहरातील रस्त्यांच्या खालून अनेक युटिलिटी असतात. एक काम करायला गेले की दुसरी तुटते. त्यातून रोज नवे प्रश्न निर्माण होतात. वाहतूककोंडीमुळे धूर आणि रस्ते खोदल्यामुळे धूळ अशा दुहेरी प्रदूषणामुळे मुंबईकर त्रस्त झाले असून श्वसनाच्या विकारांचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे. मुंबईतल्या मराठी शाळांचा प्रश्न सातत्याने चर्चेत आहे. मराठी अभ्यास केंद्राने त्यासंदर्भात अलीकडे सातत्याने आवाज उठवला आहे. मुंबईचे मराठीपण टिकवण्यासाठीच्या बाबींचा आग्रह धरला आहे. मराठीच्या प्रश्नावर राजकारण करणाऱ्या शिवसेनेने व्यापारी फायद्यापलीकडे जाऊन असे प्रश्न हाताळले नाहीत. त्याचाच फटका शिवसेनेला बसला. भाजपची प्रतिमा मराठी विरोधी आणि हिंदी भाषिकधार्जिणा पक्ष अशी आहे. अशा परिस्थितीत मराठी शाळांच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहणे गरजेचे आहे. बिगर मराठी माणूस हा भाजपचा मतदार असला तरी मुंबईचा कारभार मराठी माणूस केंद्रस्थानी ठेवूनच करावा लागेल. कोविड काळात सगळीकडच्याच सार्वजनिक आरोग्य सेवेच्या मयार्दा उघड्या पडल्या. देशातील आणि आशिया खंडातील सर्वात श्रीमंत महापालिका असा लौकिक असलेल्या मुंबईतही सार्वजनिक आरोग्य सुविधांचा बोजवारा उडाला होता. सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी काही प्रयत्न केले जाणार का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. मुंबईकरांसाठी जागतिक दर्जाच्या सुविधा निर्माण करता येतील. परंतु मुंबईकरांना श्वास घेता येईल, यासाठी काय केले जाणार आहे? मोकळ्या जागा, बागांचे संवर्धन करण्यासाठी भूमिका घेण्याची गरज आहे. मुंबईची लोकसंख्या दोन कोटींच्या पुढे गेली आहे. या वाढत्या, मराठी आत्मा असलेल्या बहुभाषिक आणि आंतरराष्ट्रीय महानगराचे नियोजन करायचे तर तसे आकलन असलेले किती लोक भाजपकडे आहेत? भारतीय जनता पक्षाने आव्हानात्मक परिस्थितीत यश मिळवल्यानंतर मुंबईकरांपुढच्या आव्हानांचा सामना करण्यासाठी शहराची नस माहिती असलेल्या लोकप्रतिनिधींची एक टीम उभी करायला हवी होती. त्यातून लोकांच्या मनात एक विश्वास निर्माण झाला असता. सत्ता बदलल्याची जाणीव झाली असती. मुंबईकरांना तशी जाणीव होत नाही, हेच दुर्दैव आहे.

गर्जा महाराष्ट्र माझा

१ मे - महाराष्ट्र दिन



लेखक -
डॉ.श्रीकांत एकनाथजी शिंदे,
खासदार,कल्याण लोकसभा क्षेत्र

संयुक्त महाराष्ट्राचा लढा म्हणजे धगधगते यज्ञकुंडच. खरं तर, हा लढा मराठी अस्मितेचा हुंकार होता. या पार्श्वभूमीवर सर्वधर्मीय,सर्वजातीय, सर्वपक्षीय नेते या लढ्यात स्वयंस्फूर्तीने सामील झाले होते.मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती व्हावी,या उद्देशपूर्तीसाठी लेखक, साहित्यकार,संपादक,पक्षीय नेते, समाजसेवक, विचारवंत, कवी, शाहीर यांनी संघटितपणे प्रखर लढा दिला,आंदोलने केली, मोर्चे काढले, याकारणी आंदोलकांना पोलिसांच्या रोषाला सामोरे जावे लागले. आंदोलकांवर अमानुष लाठीचार्ज झाला. काहींना कारावासही भोगला लागला. मुंबई राज्याच्या तत्कालिन सरकारच्या आदेशान्वये पोलिसांकडून आंदोलकांवर अंधाधुंद गोळीबारही करण्यात आला.त्यामुळे संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात एक-दोन नव्हे तर,तब्बल १०६ जणांनी आपल्या प्राणांची आहुती दिली.परंतु त्यांचे हौतात्म्य वाया गेलं नाही.अखेर मुंबई राज्याचे माजी मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांना मऱ्हाटमोळ्या शुरवीरांपुढे शरणागती पत्करावी लागली.मित्रहो,या सर्वांच्या बलिदानाची फलश्रुती म्हणजे १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली अन खऱ्या अर्थाने हा सोनियाचा दिवस ठरला.विशेष म्हणजे महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीला आज ६६ वर्षे पूर्ण होताहेत.या महान मराठमोळ्या हुतात्म्यांना विनम्र अभिवंदन! भारताचे तत्कालिन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते नव महाराष्ट्राची मुहूर्तमेढ झाली.आणि बघता-बघता, मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचं स्वप्न साकार झालं. संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील हुतात्म्यांचे चिरकाल स्मरण रहावे, या उद्देशाने महाराष्ट्र सरकारने मुंबईतील फ्लोरा फाऊंटन येथे हुतात्मा स्मारक उभारले.अशा थोर हुतात्म्यांना आम्ही समस्त महाराष्ट्रीय त्रिवार अभिवादन करतो.

नव महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री होण्याचा मान वंदनीय यशवंतराव चव्हाण यांना प्राप्त झाला. राजभवन येथे नवनिर्मित राज्याच्या उदघाटनप्रसंगी आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार,माजी मुख्यमंत्री वंदनीय यशवंतराव चव्हाण म्हणाले की,नव महाराष्ट्राच्या निर्मितीमुळे आपल्याला भरभराटीचे अन सुखाचे दिवस येतील. मराठी भाषिक प्रदेश एकत्र करून जनताभिमुख सरकार देणं हे राज्य स्थापनेचं मुळ धोरण आहे,हे सर्वांनी ध्यानी ठेवावं.राज्यातील सर्व जाती-धर्माच्या लोकांना समान न्याय-समान संधी देणं ही सरकारची मुख्य भूमिका राहील.महाराष्ट्र हे सदैव सर्वधर्मसमभावचं प्रतिक म्हणून देशाला दिशा देईल.जय हिंद-जय महाराष्ट्र! नवनिर्मित महाराष्ट्राला उद्देशून कविवर्य श्री.कृ.कोल्हटकर म्हणतात,बहु असोत सुंदर संपन्न महा...प्रिय आमुचा एक महाराष्ट्र देश हा! आपला महाराष्ट्र हा प्राणापेक्षाही प्रिय आहे. सर्वदृष्टीने गुणसंपन्न आहे. कवी कुसुमाग्रज आपल्या उत्कट शब्दात म्हणतात,माज्या मराठी मातीचा लावा ललाटासी टिळा,तिच्या संगे जागतील मायदेशातील शिळा! महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यावर मराठीला राजभाषेचा दर्जा मिळाला. माय मराठीचा गौरव करताना सुरेश भट म्हणतात, लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी, जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी, धर्म-जात- पंथ एक जाणतो मराठी, एवढ्या जगात माय मानतो मराठी! संयुक्त महाराष्ट्राचा लढा हा मराठी माणसाच्या दृष्टीने अस्मितेचा प्रश्न होता.संयुक्त महाराष्ट्रावरील कवणे गाऊन शाहिरांनी सारा महाराष्ट्र दणाणून सोडला होता. स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी १९३८ साली मराठी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर आपल्या भाषणात संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचे सूतोवाच केले.त्यानंतर पुढे २८ जानेवारी १९४० रोजी संयुक्त महाराष्ट्र सभेची स्थापना झाली.जात-धर्म -पंथ व पक्षीय अभिनिवेश बाजूला सारून सारा महाराष्ट्र एकवटला. या लढ्यात सर्वच क्षेत्रातील मान्यवरांनी कर्तव्यबुद्धीने सहभाग घेतला.सेनापती बापट, प्रबोधनकार ठाकरे, कॉ. डांगे, आचार्य अत्रे, एस.एम. जोशी, अहिल्याबाई रांगणेकर, नाना पाटील, कृष्णा देसाई, डॉ. टी. आर. नरवणे, आर.डी.भंडारे,दिनू रणदिवे,शाहीर अण्णाभाऊ साठे,शाहीर अमरशेख,शाहीर गव्हाणकर, शाहीर आत्माराम, ग. त्र्य. माडखोलकर, प्रा. मधू दंडवते, नानासाहेब गोरे, अनुताई लिमये,भाऊसाहेब हिरे, नानासाहेब कुंटे, केशवराव जेधे,मधू लिमये,डॉ.धनंजयराव गाडगीळ,तुळसीदास जाधव,दादासाहेब गायकवाड आदी मान्यवरांनी एकसंध होऊन संयुक्त महाराष्ट्र लढ्याचे रणशिंग फुंकले अन विजयी झाले.या सर्व प्रभृतींना त्रिवार मानाचा मुजरा! वास्तवात,नव महाराष्ट्राची निर्मिती झाल्यावर साऱ्या महाराष्ट्रात आनंदाची लाट उसळली होती.जागोजागी विजयाच्या पताका फडकल्या.नव राज्याच्या निर्मितीमुळे सर्वत्र जल्लोषाचे वातावरण निर्माण झालं होतं. ढोल-ताशे,तुतारींच्या निनादात जयघोष करत हजारोंच्या संख्येनं भूमिपुत्रांनी हा सोनियाचा दिवस नाचत-गात,गुलाल उधळत मोठ्या धुमधडाक्यात साजरा केला.याप्रसंगी मराठी माणसाचे ऐक्य अन् सामथ्यार्चे खरे दर्शन झाले. त्याची परिणती म्हणजे तत्कालिन केंद्र सरकारसह मुंबई राज्याचे तत्कालिन मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांना अखेर मराठी भूमिपुत्रांपुढे गुडघे टेकावे लागलेत. देशाच्या स्वातंत्र्यासाठी जसं मराठी क्रांतीवीरांनी बलिदान दिलं.त्याप्रमाणेच मराठी भूमिपुत्रांनी संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी जणू आपल्या रक्ताचा अभिषेकच केला.अशा महान मराठमोळ्या भूमिपुत्रांना आम्ही त्रिवार मानाचा मुजरा करतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अन उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या संयुक्त प्रयत्नातून शाहीर साबळे यांच्या गर्जा महाराष्ट्र माझा या गीताला राज्यगीत चा दर्जा मिळाला, हे राज्याच्या दृष्टीने गौरवास्पद आहे. उल्लेखनीय गोष्ट म्हणजे ना. शिंदेसाहेब मुख्यमंत्री असताना मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला,याचा आम्हा मराठी भाषिक जनतेला सार्थ अभिमान आहे.याबद्दल राज्यातील सर्वधर्मीय नागरिक पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, गृहमंत्री अमितजी शाह तथा राज्यातल्या महायुती सरकार यांचे शतशः आभारी आहेत.

महाराष्ट्र
चिराऊ होवो!
जय शिवराय !जय महाराष्ट्र !

'सायबर' ठगांना रोखणारे महाठग व्हा!



मागील काही वर्षांत देशात 'सायबर' गुन्ह्यांचे प्रमाण वेगाने वाढत आहे. वर्ष २०२५ मध्ये भारतात एकूण २८ लाख १५ सहस्र सायबर गुन्ह्यांच्या तक्रारी प्रविष्ट करण्यात आल्या आहेत. यामध्ये तब्बल २२ सहस्र ४९५ कोटी रुपयांची फसवणूक झाली आहे. वर्ष २०२४ च्या तुलनेत हे प्रमाण २४ टक्क्यांनी वाढले आहे. मागील काही वर्षांत अशा प्रकारे सायबर गुन्ह्यांचा क्रम चढता आहे. यामध्ये सर्वाधिक फसवणुकीच्या घटना महाराष्ट्रात घडल्या आहेत. महाराष्ट्रात वर्ष २०२५ मध्ये सायबर गुन्ह्यांद्वारे ३ सहस्र २०३ कोटी रुपयांची फसवणूक झाली आहे. सायबर गुन्ह्यांचे हे वाढते प्रमाण निश्चितच चिंताजनक आहे; परंतु यामधील अधिक चिंतेची गोष्ट ही आहे की, गुन्हेगारांनी फसवणूक करणे आणि पोलिसांनी त्यांचा शोध घेत रहाणे, ही स्थिती! मागील काही वर्षांतील सायबर गुन्हेगारी पहाता अन्वेषण यंत्रणा केवळ बचावात्मक स्थितीत राहून काम करत आहे. मर्यादित षटकांच्या क्रिकेटच्या सामन्यामध्ये प्रथम फलंदाजी करणारा संघ जितकी धावसंख्या उभारतो, ती गाठण्यासाठी दुसरा संघ खेळत असतो. यामध्ये गोलंदाजी प्रभावी असेल, तर अनेकदा फलंदाजांना प्रारंभी बचावात्मक खेळावे लागते. खेळपट्टीवर टिकून रहाणे, हा त्यामागील उद्देश असतो. नंतर मात्र खेळाडूंना बचावात्मक नव्हे, तर आक्रमकपणे खेळावे लागते, तरच प्रतिस्पर्धी संघाने उभारलेली धावसंख्या गाठता येते. अर्थात् सामना जिंकता येतो; परंतु सायबर गुन्ह्यांमध्ये मात्र अन्वेषण यंत्रणा बचावात्मक स्थितीतून बाहेर यायला सिद्ध नाहीत. खेळात ज्याप्रमाणे ठराविक टप्प्यानंतर बचावात्मक पवित्रा सोडून खेळाडूला आक्रमक पवित्रा घ्यावा लागतो, त्याप्रमाणे सायबर गुन्ह्यांच्या अन्वेषणामध्ये आक्रमक पवित्रा घेण्याची आवश्यकता आहे. अर्थात् प्रत्यक्ष चोरीमध्ये गुन्हेगारांचा शोध घेणे आणि पकडणे सायबर गुन्ह्याच्या तुलनेत सोपे असते. सायबर गुन्ह्यांत मात्र प्रत्यक्ष गुन्हा करणारी व्यक्ती परदेशात, तर काही वेळा अन्य राज्यांत असल्यामुळे यांमध्ये कारवायांना मयार्दा येत आहेत. ही समस्या मागील अनेक वर्षांपासून आहे. सायबर गुन्हेगारीला आळा घालायचा असेल, तर अन्वेषणात बाधक ठरणाया या तांत्रिक अडथळ्यांना पार करावेच लागेल. मागील काही वर्षांपासूनच्या डिजिटल (ऑनलाईन) फसवणुकीच्या घटना पहाता फसवणुकीसाठी वेगवेगळ्या प्रकारांचा उपयोग केला जात आहे.

यापूर्वी दुर्मिळ नाणी अथवा वस्तू कोट्यवधी रुपयांना खरेदी करायची असल्याचे सांगून त्यासाठी लागर्णाया सीमा शुल्कासाठी लाखो रुपये भरायला सांगणे, विवाहानिमित्त विदेशातून भेट पाठवायची असल्याचे सांगून सीमा शुल्क भरायला सांगणे, अधिकोषाला 'ई-केवायसी' (इलेक्ट्रॉनिक माध्यमातून ओळख पटवणे) पडताळायची असल्याचे सांगून ॲप डाऊनलोड करायला सांगून त्याद्वारे ऑनलाईन पैसे वळते करणे, व्हिडिओ कॉल करून नग्न होऊन समोरील व्यक्तीला आक्षेपार्ह कृती करायला सांगणे आणि नंतर 'ब्लॅकमेल' करणे, 'डीपफेक' व्हिडिओ सिद्ध करून त्याद्वारे 'ब्लॅकमेल', 'डिजिटल अरेस्ट' (आभासी अटक) करण्यात आली असल्याचे सांगून पैशांची मागणी करणे, अशा प्रकारे सायबर गुन्ह्यांच्या पद्धती दिवसेंदिवस पालटत जात आहेत. एका प्रकाराविषयी जागृती होईपर्यंत फसवणुकीचा पुढचा प्रकार येतो आणि काही नागरिक त्याला बळी पडल्यावर; म्हणजे काही जणांना कोट्यवधी रुपयांचा फसल्यावर तो प्रकार कळतो आणि जनजागृती त्याचा पुढचा टप्पा होय! अशा एका प्रकाराने फसवणूक होऊन त्याविषयी जनजागृती होईपर्यंत सायबर गुन्ह्यांचा आणखी नवा फसवणुकीचा फंडा आणला जातो. महाराष्ट्रात मुख्यतः मुंबईमध्ये मागील मासात 'डिजिटल अरेस्ट'चे अनेक प्रकार घडल्यावर मुंबई पोलिसांनी त्याविषयी मोठ्या प्रमाणात जनजागृती केली. 'नॅशनल सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टल'च्या अहवालानुसार जानेवारी २०२६ मध्ये 'डिजिटल अरेस्ट' द्वारे देशभरात तब्बल ३ सहस्र कोटी रुपयांची फसवणूक झाली. यामध्येही महाराष्ट्र राज्यच अग्रेसर आहे.

केवळ मुंबईमध्ये वर्ष २०२५ मध्ये १५५ कोटी रुपयांची फसवणूक झाली. यामध्ये विशेषतः निवृत्त ज्येष्ठ नागरिकांना लक्ष्य करण्यात आले. 'डिजिटल अरेस्ट'चे वाढते प्रकार लक्षात घेऊन मुंबई पोलिसांनी याविषयी एक जनजागृती मोहीम राबवली. मुंबई पोलिसांनी घरोघरी जाऊन, सोसायट्यांमध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या बैठका घेऊन याविषयी जनजागृती केली. मुंबई पोलिसांनी राबवलेली ही मोहीम निश्चितच कौतुकास्पद होती. त्यामुळे काही प्रमाणात का होईना 'डिजिटल अरेस्ट'चे प्रकार रोखता आले असे म्हणता येईल; परंतु 'डिजिटल अरेस्ट' विषयी युद्धपातळीवर जनजागृती झाली, तोवर इराण आणि अमेरिका यांतील युद्धाच्या पार्श्वभूमीवर 'पाईप गॅस बंद करत आहोत आणि जोडणी बंद करायची नसेल, तर पैसे भरा', असे सांगून नागरिकांची फसवणूक करण्यात आल्याचे अनेक प्रकार मागील २ आठवड्यांमध्ये मुंबईत घडले. यामध्ये सांगायचे सूत्र हेच आहे की, ऑनलाईन आर्थिक व्यवहारांच्या काळात आर्थिक गुन्हेही त्याच प्रकारे वाढत जातील. येर्णाया काळात सायबर गुन्ह्यांची वाढ लक्षणीय असेल. हे लक्षात घेऊनच महाराष्ट्र सरकारने २ सहस्र कोटी रुपये व्यय करून देशात प्रथमच सायबर सुरक्षा प्रकल्प कार्यान्वित केला आहे; परंतु त्यानंतरही सायबर गुन्हे रोखण्यातील यश अत्यल्प आहे, ही वस्तूस्थिती आहे. ऑनलाईन फसवणूक होणारे बहुतांश मध्यमवर्गीय सर्वसामान्य आहेत. त्यांनी 'उतारवयातील जगण्याचा प्रबंध' म्हणून आयुष्यभराच्या कष्टातून जमवलेली आर्थिक पुंजी काही क्षणात चोरीला जाणे निश्चितच धक्कादायक आणि वेदनादायक आहे. ज्याच्यावर प्रसंग ओढवला असेल, तोच हे समजू शकतो. त्यामुळे फसवणूक झालेल्या व्यक्तीला आधार देण्याची संवेदना पोलिसांनी दाखवायला हवी. प्रत्यक्षात मात्र तसे होतांना दिसत नाही. सायबर गुन्हे रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक काळजी, प्रत्यक्ष गुन्हा घडल्यावर करावयाची कृती, जलद गतीने अन्वेषण आणि त्यासाठी आवश्यक अत्याधुनिक यंत्रणा या ४ टप्प्यांवर काम होणे आवश्यक आहे.

यासह ऑनलाईन गुन्ह्यांचे स्वरूप लक्षात येण्यासाठी अभ्यासक्रमात त्याचा समावेश, ज्येष्ठ नागरिकांना प्रशिक्षण आदी गोष्टींचा अवलंब करावा लागेल. ऑनलाईन फसवणुकीचा कॉल आल्यावर त्याविषयी 'अलर्ट' भ्रमणभाषवरून थेट सायबर पोलिसांना कळवता येईल आणि फसवणूक करणाया व्यक्तीचेच खाते त्वरित बंद करता येईल, अशा अत्याधुनिक यंत्रणा भविष्यात विकसित कराव्या लागतील. शेवटी ठगाला वठणीवर आणण्यासाठी महाठगच व्हावे लागते!

पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार,०५ मे २०२६ ते ११ मे २०२६

टिटवाळ्यातील थरारक घटनाक्रम... अश्विनी व्हायची रुकसाना, पण पोलिसांनी...

कचऱ्याच्या डब्यात 6 कोटींच्या गोळ्या!



कोण आहे ती ड्रग्ज पेडलर?

टिटवाळ्यातून अटक केलेली पॉल पूर्वी डान्सबारमध्ये काम करायची. डान्सबारची नोकरी सोडल्यानंतर ती ड्रग्ज सप्लायर बनली आहे. ड्रग्ज सप्लायर पॉलची दोन लग्न केले आहेत. एक नवरा गुन्हेगार असून त्याचाही पोलिसांकडून शोध सुरू आहे. नेस्कोमध्ये ड्रग्जच्या सेवनानंतर दोन तरुणांचा मृत्यू झाला होता. आणि त्यामुळे मुंबईत एकच खळबळ उडाली होती..त्यानंतर मात्र पोलिसांनी ड्रग्ज पेडलरचा माग काढत मुसक्या आवळायला सुरुवात केली.. आधी साकीनाक्यातून इरफान अन्सारी आणि त्यानंतर टिटवाळ्यातून पॉल नावाच्या महिला ड्रग्ज पेडलरला अटक केलीय.. आता या पॉलच्या चौकशीत मोठं ड्रग्जचं रॅकेट समोर येण्याची शक्यता वर्तवण्यात येते आहे.

कल्याण। टिटवाळ्यामधील ड्रग्ज सप्लायर अश्विनी पॉलचा माग काढणे हे मुंबई पोलिसांसाठी मोठे आव्हान होते. पण, पोलिसांनी एक भन्नाट आयडिया लढवली आणि अश्विनी सहज पोलिसांच्या जाळ्यात अडकली. अश्विनी पॉलपर्यंत पोलीस कसे पोहोचले यासंदभार्तील रंजक माहिती आणि संपूर्ण घटनाक्रम समोर आला असून हा घटनाक्रम एखाद्या क्राइम थ्रीलर चित्रपटाप्रमाणे आहे. पोलीस कसे घरात घुसले? पालिका सर्व्हेच्या नावाखाली टिटवाळा येथील पद्मावती कॉम्प्लेक्समध्ये पोलिसांनी एंट्री केली. याच सर्वेक्षणाच्या माध्यमातून सुरु असलेल्या गुप्त रेकीदरम्यान पोलिसांनी अश्विनीचे घर सापडले आणि लगेच छापा घातला, तेव्हा अश्विनीने स्वतःला 'बार गर्ल' असल्याचे सांगितले. पण, पोलिसांचे लक्ष घरातील कचऱ्याच्या डब्याकडे गेले. घराच्या कोपऱ्यात आसलेला आणि सहज लक्षात न येणारा हा कचऱ्याचा डबा उघडताच त्यात लपलेल्या 6 कोटींच्या 5 हजार एक्स्टसी गोळ्या पोलिसांनी दिसल्या आणि अश्विनीचा भांडाफोड झाला. लिव्ह-इन पार्टनरच झाला क्राइम पार्टनर चौकशीत अश्विनीचा लिव्ह-इन पार्टनर अमीर सय्यद तिच्या घरापर्यंत ड्रग्जचा पुरवठा करत होता असं समोर आलं आहे. तर अश्विनी या ड्रग्जची विक्री करायची.

अमीर आणि अश्विनी दोघे मिळून हे रॅकेट चालवत होते. मंगळवारी रात्री उशिरा या प्रकरणामध्ये पोलिसांनी अमीरलाही अटक केली आहे. अमीरच्या चौकशीतून या प्रकरणामधील पुढील धागेदोरे हाती लागण्याची शक्यता आहे. अटकेचा थरारक घटनाक्रम अश्विनी दोन महिन्यांपूर्वीच टिटवाळा येथील घरात भाड्याने राहण्यास गेली होती. पोलिस उपायुक्त नवनाथ ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली घाटकोपर कक्षाचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अनिल ढोले आणि पथकाने अश्विनीचा शोध सुरू केला. यावेळी दोन-दोन पोलिसांच्या पथकाने पालिका अधिकाऱ्यांच्या बहाण्याने सर्वेक्षण सुरू केलं. कुणालाही काही माहिती लागू न देता ते अश्विनीच्या घरापर्यंत पोहोचले. अश्विनीचे घर सापडल्याचा ग्रीन सिग्नल मिळताच पथकाने छापा टाकत झाडाझडती सुरू केली. या कारवाईने अश्विनीचा गोंधळ उडाला. मात्र, सुरुवातीला तिनेही आपण फक्त बार गर्ल असेपर्यंतची ओळख पुढे आणली. पोलिसांनी तिचे संपूर्ण घर पिंजून काढले, मात्र हाती काहीच लागले नाही. अखेरीस पोलिसांचे लक्ष कचऱ्याच्या डब्याकडे गेले. त्यांनी ते उघडताच हाती 6 कोटींचे ड्रग्ज लागल्याने अश्विनीचे बिंग फुटले. कोर्टाचा खर्च भागवण्यासाठी ड्रग्ज विक्री अमीर कोर्टात तारखेला हजर राहत नसल्याने डीआरआयच्या प्रकरणात फेब्रुवारीत त्याच्याविरुद्ध वारंट जारी केले होते. कारागृहात जाण्यापूर्वीच फेब्रुवारीमध्ये अमीरने या गोळ्या अश्विनीकडे देत पुढे विक्री करण्यास सांगितले. जेणेकरून त्या विकून अमीरचा पुढचा कोर्ट प्रकरणाचा खर्चही भागेल. अमीर आणि इरफानची ओळख कारागृहात असतानाच झाली. अमीरने यापूवीर्ही मोठ्या प्रमाणात गोळ्या इरफानला विक्रीसाठी दिल्याचा संशय आहे.

तेथेच अमीरला भेटायला येताना अश्विनीची इरफानसोबत ओळख झाली. त्यानुसार, अमीरचा ताबा घेत त्याला अटक केली. पैसा आला कुठून? रुकसाना नावाने बनावट आधार कार्ड एवढ्या मोठ्या किमतीचा साठा घेण्यासाठी किमान 1 कोटी रुपये अगाऊ दिल्याचा अंदाज आहे. मात्र, हे ड्रग्ज घेण्यासाठी पैसे कुठून आले? नेमका हा साठा किती आला होता? याच्या तपासासाठी अश्विनीच्या बँक खात्यासह मालमत्तांची माहिती काढण्यात येत आहे. बँक खात्यातील माहिती मिळताच पुढे ती रक्कम गोठविण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. स्वतःची ओळख लपविण्यासाठी अश्विनी बनावट नावाचाही वापर करत होती. यासाठी ती रुकसाना शेख नावाने आधार कार्ड वापरत असल्याचेही समोर आले.

'पैसे देतो, लॉजवर भेट!' अनोखळी नंबरवरुन आलेला मेसेज तरुणीने घरच्यांना दाखवला अन्...

अटकेचा थरार

नातेवाईकांच्या सांगण्यावरून तरुणीने जावेदला डोंबिवलीत एका ठिकाणी भेटायला बोलावले. ठरल्याप्रमाणे जावेद ठिकाणी चार चाकी गाडी घेऊन आला. सुरुवातीला त्यांनी तरुणीला पुढे येण्यास सांगितले. काही अंतरावर जाऊन त्याने तरुणीला गाडीत बसण्यासाठी जबरदस्ती केली. याच वेळी त्यांच्या मागावर असलेल्या तरुणीच्या नातेवाईकांनी आणि हिंदुत्ववादी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी जावेदला पकडून चोप दिला. जावेदला त्यांनी रामनगर पोलिसांच्या ताब्यात दिले. रामनगर पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करत जावेद खान याला अटक केली. याप्रकरणी पुढील तपास पोलीस करत आहेत. या घटनेमुळे तरुणीने दाखवलेल्या प्रसंगावधान आणि धाडसाचे सर्व स्तरातुन कौतुक होत आहे. स्थानिक आमदार राजेश मोरे यांनी आरोपीला कठोर शासन करण्याची मागणी केली आहे. तसेच सामाजिक कार्यकर्ते संदीप चव्हाण यांनीही आरोपीला पोलिसांनी कठोर शिक्षा करावी असं म्हटलं आहे.



डोंबिवली। तरुणीला वारंवार मेसेज, कॉल करून पैशांचे आमिष दाखवून लॉजवर बोलावणाऱ्या तरुणाला तरुणीच्या नातेवाईकांसह हिंदुत्ववादी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी फिल्मी स्टाईलने पकडले. त्याला चांगलाच इंगा दाखवत राम नगर पोलिसांच्या ताब्यात दिले. रामनगर पोलिसांनी गुन्हा दाखल करत या विकृत तरुणाला अटक केली आहे. जावेद खान असं या तरुणाचे नाव असून तो मुंब्रा येथे राहणार आहे. नंबरवरून व्हाट्सअपवर मेसेज सदर पीडित तरुणी वांगणी येथे राहत असून कॉलेजमध्ये शिक्षण घेत आहे. 19 एप्रिल रोजी या तरुणीला अनोळखी नंबरवरून व्हाट्सअपवर मेसेज आला. समोरचा अज्ञात इसम तिच्याशी व्हाट्सअप वर चॅटिंग करण्याचा प्रयत्न करत होता. दुसऱ्या दिवशी या व्यक्तीने विविध नंबरवरून तिला मेसेज करणे सुरू केले. इतकेच नव्हे तर पैशांचे आमिष दाखवून तिला भेटण्यासाठी बोलावण्याचा प्रयत्न केला. तिने नकार देत दुर्लक्ष केल्यानंतरही हा तरुण तिला वारंवार मेसेज करत त्रास देत होता. घडलेल्या प्रकारामुळे या तरुणाला अद्दल घडवण्याचे तरुणीने ठरवले तिने याबाबत आपल्या नातेवाईकांना माहिती दिली. महिलांना फसवणाऱ्या एका भोंदू फकीराला अटक दरम्यान, दुसरीकडे मुंबई पोलिसांनी महिलांना फसवणाऱ्या एका भोंदू फकीराला अटक केली आहे. हा फकीर बाबा महिलांना त्यांच्या समस्या सांगून उपचाराच्या नावाखाली आधी बेशुद्ध करायचा आणि नंतर त्यांच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. फकीर बाबांचे नाव इरफान नियाज अहमद आहे. 34 वर्षीय इरफान नियाज अहमद मूळचा बहराइच, उत्तर प्रदेशचा आहे. तो गेल्या अनेक वर्षांपासून मुंबईत राहत असून स्वतःला फकीर बाबा म्हणवतो आणि उपचाराच्या नावाखाली महिलांचा विनयभंग करतो. या फकीराने कांदिवलीत राहणाऱ्या एका स्त्रीला स्वतःची बाबा म्हणून ओळख करून दिली. मला माहित आहे की तुमचे पती आता या जगात नाहीत. तुझ्यावर दोष आहे. हा दोष दूर करण्यासाठी एक पद्धत अवलंबावी लागेल. त्यानंतर बाबांनी त्या स्त्री आणि तिच्या दोन मुलींसोबत विधी करायला सुरुवात केली, ज्यामध्ये तिघीही बेशुद्ध पडल्या. त्यानंतर फकिराने एका मुलीचा विनयभंग केला. घटनेची माहिती मिळाल्यानंतर, कांदिवली पोलिसांनी फकीरविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम 74, 78, 123, 3 (2) अंतर्गत एफआयआर नोंदवून त्याला 13 तारखेला अटक केली.

ठाणे आणि नवी मुंबईतील जलसाठ्यांना पाणथळ म्हणून मान्यता देण्यास प्रशासनाचा नकार



ठाणे , ठाणे आणि नवी मुंबईतल्या जलसाठ्यांना पाणथळ म्हणून मान्यता देण्यासही प्रशासनाचा नकार. ठाणे आणि नवी मुंबईतील जलसाठ्यांवर फ्लेमिंगो पक्षांचा घोळका असतो. दर वर्षी हे पक्षी स्थळांतर करून या भागांमध्ये येत असतात. त्यामुळे ठाणे आणि नवी मुंबईला फ्लेमिंगो सिटि म्हणून देखील ओळखले जाते. ठाणे जिल्हास्तरीय पाणथळ सनियंत्रण समितीच्या अहवालात नवी मुंबई व ठाण्यातील फ्लेमिंगो अधिवासांसह आठ महत्त्वाच्या जलसाठ्यांना पाणथळ म्हणून मान्यता नाकारल्यामुळे वाद निर्माण झाला आहे. या ठिकाणी फ्लेमिंगो पक्ष्यांचा मुक्तविहार असूनही या अहवालात ही ठिकाणे पाणथळ नसल्याचे नाकारण्यात आल्याने पर्यावरणवाद्यांनी याला तीव्र आक्षेप घेतला आहे.केंद्र सरकार नियुक्त संस्थेचे शास्त्रीय निष्कर्ष, न्यायालयीन आदेश आणि माहिती अधिकारांतर्गत उपलब्ध नोंदींशी हा अहवाल विसंगत असल्याची टीका पर्यावरणवाद्यांनी केली. पाणथळ सनियंत्रण समितीने एनआरआय परिसरातील फ्लेमिंगो पॉइंट, टी. एस. चाणक्य जलसाठा, लोटस तलाव, ज्वेल ऑफ नवी मुंबई यांसह आठ ठिकाणांचा अभ्यास करून त्यांना पाणथळ नियम 2017 अंतर्गत अपात्र ठरवले आहे. मानवनिर्मित स्वरूप, पूवीर्चा वापर आणि विकास आराखड्यातील आरक्षण ही कारणे यासाठी पुढे करण्यात आली आहेत. मात्र पर्यावरणवादी कार्यकर्ते बी. एन. कुमार यांनी 2024 मध्ये माहितीच्या अधिकाराखाली राज्याच्या पर्यावरण विभागाकडून मागवलेल्या माहितीनुसार, 7 ते 21 मार्च 2024 दरम्यान केंद्र सरकार नियुक्त नॅशनल सेंटर फॉर सस्टेनेबल कोस्टल मॅनेजमेंट या संस्थेच्या शास्त्रज्ञांनी केलेल्या सर्वेक्षणात याच जलसाठ्यांची पाणथळ म्हणून अधिकृत नोंद करण्यात आली असून, संबंधित ठिकाणांचे अक्षांश-रेखांशही नमूद करण्यात आले असताना जिल्हा समितीने या नोंदींकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे

ट्रकच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू

वसई। वसईत धुमाळनगर परिसरात भंगाराने भरलेल्या ट्रकखाली पादर्चायाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी रात्री घडली.



या अपघातानंतर संतप्त नागरिकांनी गोंधळ घालत प्रशासनाविरोधात नाराजी व्यक्त केली. मिळालेल्या माहितीनुसार, बिंदर रामनारायण प्रजापती (वय ५५) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. शुक्रवारी रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास ते धुमाळ नगर परिसरात रस्त्याने पायी जात होते. त्याच वेळी भंगाराने भरलेला ट्रक वजन काट्याकडे जात होता. अचानक चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रक प्रजापती यांच्या अंगावरून गेला. या अपघातात ट्रकचे चाक त्यांच्या दोन्ही पायांवरून गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

घटना घडल्यानंतर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने घटनास्थळी जमा झाले.संतप्त नागरिकांनी यावेळी पोलिसांशी शाब्दिक वाद घातल्याची माहिती समोर आली आहे. धुमाळ नगर येथील वजन काट्याजवळ नेहमीच मोठ्या वाहनांची गर्दी आणि वाहतूक कोंडी होत असल्याचा स्थानिकांचा आरोप आहे. याआधीही येथे अपघात घडले असून प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

'सी माय ब^%$#... हिंदू मुलींना आता'... 'ते' फोटो पाठवून अशरफचे तरुणीला अश्लील मेसेज

वसई। मुंबईतील एका 19 वर्षीय तरुणीला व्हॉट्सॲपद्वारे अश्लील मेसेज आणि कॉल करून त्रास दिल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. संबंधित तरुणी आपल्या कुटुंबासोबत मुंबईत राहते. पीडित तरुणी फेब्रुवारी 2026 मध्ये एका कन्स्ट्रक्शन कंपनीत टेलीकॉलर म्हणून कामाला रुजू झाली होती. सुमारे 15 दिवसांनी साइट बंद झाल्यामुळे तिने नोकरी सोडली होती. त्याच ठिकाणी काम करणाऱ्या काही सहकाऱ्यांशी तिची ओळख झाली होती. नोकरी सोडल्यानंतर त्या कंपनीतील अशरफ नावाच्या तरुणाने तिला अश्लील मेसेज करुन त्रास दिल्याचा तसेच शारिरीक संबंधाची मागणी केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आलाय. या प्रकरणी पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा करण्यात आलाय. संबंधित पीडित तरुणीला दि. 21 एप्रिल 2026 रोजी सकाळी सुमारे 11.15 वाजता तिच्या मोबाईलवर अनोळखी क्रमांकावरून व्हॉट्सॲप मेसेज आला. चौकशी केल्यानंतर संबंधित व्यक्तीने स्वतःचे नाव अशरफ असल्याचे सांगितले आणि तो तिच्या पूर्वाश्रमीच्या कंपनीत काम करत असल्याचेही नमूद केले. त्यानंतर त्याने सतत मेसेज करून तरुणीला 'क्युट' असल्याचे सांगत संपर्क वाढवण्याचा प्रयत्न केला. काही वेळातच त्याने व्हॉट्सॲप कॉल करून अश्लील भाषेत संवाद साधण्यास सुरुवात केली. तरुणीने हा संवाद शेजारील मुलाच्या मोबाईलवर रेकॉर्ड करून ठेवला असून, आरोपीने तिच्यासोबत लॉजवर जाऊन लैंगिक संबंध ठेवण्याची तसेच ओरल सेक्सची मागणी केल्याचे नमूद केले आहे. वारंवार कॉल, फोटो व व्हिडिओ पाठवून त्रास तक्रारीनुसार, आरोपीने दि. 22 एप्रिल रोजीही वारंवार कॉल आणि मेसेज करून त्रास देणे सुरूच ठेवले. त्याने काही मुलींचे फोटो पाठवत त्यांच्यासोबत संबंध ठेवल्याचा दावा केला. तसेच स्वतःचा अश्लील फोटो पाठवून ह्यसी माय बनानाह्व असा मेसेज केला. संबंधित फोटो पाहिल्यानंतर त्याने तो लगेच डिलीट केला, मात्र तरुणीने चॅटचे स्क्रीनशॉट जतन करून ठेवले आहेत. याशिवाय आरोपीने तिला अनेक अश्लील व्हिडिओ पाठवले आणि अयोग्य मागण्या केल्याचेही तक्रारीत नमूद आहे. आरोपी एवढ्यावरच थांबला नाही. त्याने 'आता हिंदू मुलींना मुस्लिम मुलं आवडतात', असा देखील मेसेज केलाय. त्यानंतर तरुणीने तिच्या ओळखीतील दोन सहकारी मैत्रिणींशी संपर्क साधला असता, त्यांनाही अशाच प्रकारचे मेसेज आणि कॉल आल्याचे समोर आले. त्यांनी आरोपीचा नंबर ब्लॉक केल्याचे सांगितले. मात्र, आरोपीकडून अश्लील मेसेज येणे दि. 23 एप्रिलपर्यंत सुरूच राहिल्याने तरुणीने वडिलांसह पोलीस ठाण्यात धाव घेतली. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता 2023 मधील कलम 75, 78(2), 79 तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम 2000 च्या कलम 67(अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिरा-भाईंदरमध्ये डान्स बारवर धाड

भाईंदर। मिरा -भाईंदरमध्ये नवघर पोलीस ठाणे हद्दीतील 'अण्णा पॅलेस डान्सबार' वर काशीमिरा गुन्हे प्रकटीकरण, कक्ष-१ यांनी कारवाई करत भितींच्या कप्पात बांधलेली गुप्त खोली (कॅव्हिटी)शोधत त्यातून १३ मुलींची सुटका केली आहे. याप्रकरणी नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हे प्रकटीकरण कक्ष-१, काशिमिराचे पोलीस निरीक्षक सुशिलकुमार शिंदे यांना गुप्त मिळालेल्या माहितीवरून २३ एप्रिल रोजीच्या मध्यरात्री ऑर्केस्ट्रा बारवर छापा टाकण्यात आला. त्यानंतर पोलिसांनी एक दीड तासांनी कॅव्हिटीतून सहा मुलींना बाहेर काढून एकूण १३ मुलींची सुटका करण्यात आली आहे. सदर छाप्यादरम्यान बारमधील स्टेजवर ४ महिला सिंगर्स या तोकडे कपडे परिधान करून अश्लिल अंगविक्षेप करीत असताना मिळून आल्या आहेत. तसेच, बारच्या टेरेसवर उभारण्यात आलेल्या मेकअप रूममध्ये ३ मुली आढळून आल्या आहेत. त्यानंतर, बारच्या इमारतीमधील सर्व खोल्यांचे निरीक्षण करीत असताना बारमधील बाथरूम व जिन्याशेजारील जागा यामध्ये लावण्यात आलेल्या टाईल्समध्ये फरक असल्याचे दिसून आले. अरूंद खोली (कॅव्हिटी) तयार केली असण्याची शक्यता वाटल्याने त्याबाबत अधिक तपास करता सदर ठिकाणी भिंतीला टाईल्स लावून त्याच्याआड इलेक्ट्रॉनिक पध्दतीने उघडणारा जाड लोखंडी दरवाजा बसवून आतमध्ये ८ फूट बाय २.५ फूट लांबी रुंदीची अरुंद पोकळी (कॅव्हिटी) बनविली असल्याचे आढळून आले. सदर कॅव्हिटीमध्ये ६ मुली दाटीवाटीने गुदमरल्या अवस्थेत उभ्या असताना मिळून आल्या आहेत. याप्रकरणी १३ आरोपींविरोधात नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच, बारमध्ये मिळून आलेल्या एकूण १३ मुलींची तेथून सुटका करण्यात आली आहे.

'म्हाडा आरक्षण' चौकशीसाठी समिती स्थापन; विभागीय आयुक्त करणार चौकशी

मुंबई : नाशिकमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि अल्प उत्पन्न गटासाठी राखीव असलेल्या 20 टक्के म्हाडा कोट्याच्या अंमलबजावणीत झालेल्या अनियमिततेची चौकशी करण्यासाठी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे. समितीला आपला अहवाल सादर करण्यासाठी एक महिन्याची मुदत देण्यात आली आहे. राज्य विधिमंडळाच्या नुकत्याच पार पडलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात नाशिक मधील पंतप्रधान आवास योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत आणि म्हाडा आरक्षणाच्या विषयावर भाजपच्या देवयानी फरांदे आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या नितीन पवार यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यावेळी झालेल्या चर्चेला उत्तर देताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी समिती स्थापन करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार महसूल विभागाने आज चौकशी समिती स्थापन करण्याबाबतचा शासन निर्णय जारी केला आहे. या समितीत सदस्य म्हणून जमाबंदी आयुक्त (पुणे), नोंदणी महानिरीक्षक आणि मुद्रांक नियंत्रक (पुणे), पोलिस आयुक्त



(नाशिक) आणि संचालक, नगर रचना व नियोजन (पुणे) यांचा समावेश आहे. तर उपसंचालक भूमि अभिलेख, नाशिक विभाग हे या समितीचे सदस्य सचिव आहेत.

नाशिकमध्ये म्हाडाच्या घरकुल योजनेंतर्गत बनावट कागदपत्रे, खोटे शिक्के आणि सह्यांचा वापर करून अनेक बिल्डरांनी कोट्यवधींची फसवणूक केल्याचा मोठा घोटाळा उघडकीस आला आहे. नियमांनुसार कोणत्याही बांधकाम व्यावसायिकाने 4 हजार चौरस मीटरपेक्षा मोठ्या क्षेत्रावर गृहप्रकल्प उभारताना त्या प्रकल्पातील 20 टक्के घरांचा कोटा म्हाडासाठी राखीव ठेवणे बंधनकारक असते. या योजनेचा उद्देश आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांना परवडणाऱ्या दरात घर उपलब्ध करून देणे हा आहे. मात्र बांधकाम व्यावसायिकांनी हा नियम टाळण्यासाठी गृहप्रकल्पाचे क्षेत्रफळ मुद्दाम कमी दाखवले. तसेच बनावट कागदपत्रे आणि खोट्या सही-शिक्क्यांच्या माध्यमातून राज्य सरकारची दिशाभूल केल्याचे समोर आले आहे. भूमी अभिलेख कार्यालयाने केलेल्या पडताळणीत एकूण १२८ प्रकरणांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ४९ प्रकरणांमध्ये सरकारची फसवणूक झाल्याचे उघड झाल्याने भूमी अभिलेख विभागाच्या तक्रारीवरून सरकारवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चौकशी समितीच्या तपासाचे मुख्य मुद्दे

8 नोव्हेंबर 2013 च्या अधिसूचनेनुसार, 4 हजार चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्र असलेल्या ज्या ले-आऊटमध्ये 20 टक्के भूखंड किंवा सदनिका म्हाडाला उपलब्ध करून दिल्या नाहीत, अशा प्रकरणांची चौकशी करणे

ज्या ठिकाणी आरक्षण दिले गेले नाही, ते क्षेत्र प्रचलित नियमांनुसार शासनाकडे वसूल करणे

चौकशीत दोषी आढळणाऱ्या संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगविषयक कारवाईची शिफारस करणे

अनियमिततेस जबाबदार असणारे जमीन मालक किंवा विकासक यांच्याविरुद्ध फौजदारी कारवाई प्रस्तावित करणे

भविष्यात अशा प्रकारच्या अनियमितता टाळण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात याबाबतही समिती मार्गदर्शन करणार आहे

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com